इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्रक, क्रमांक : नप्राशा-२००८/(प्र. क्र.६७८)/प्राशि-३,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जानेवारी, २०११.

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : नप्राशा-२००८/(प्र. क्र.६७८)/प्राशि-३, दिनांक १८ ऑगस्ट, २००९,

(२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा. क्र. शिउसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि/ १३३७/१०, दिनांक १६ जानेवारी, २०१०,

(३) शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ यांचे पत्र क्र.:- शिक्षण/खाप्राशा/ ३/ काविव/११९/२०१०, दिनांक १९/०३/२०१०.

**<u>शासन शुध्दीपत्रकः-</u>** संदर्भाधीन शासन निर्णय दिदनांक १८ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयाच्या सहपत्रातील जिल्हा पुणे अंतर्गत अनुक्रमांक ५८ मधील रकाना क्रमांक : ३ मध्ये स्टेफिंग स्टोन स्कूल ऐवजी स्टेफिंग स्टोन स्कूल, थेरगाव, पुणे ३३ असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( आ. भ. जगताप )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
(२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे,
(३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे,
(४) प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८,
(५) निवड नस्ती प्राशि-३.

इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबतच्या शासन निर्णय क्रमांक नप्राशा -२००८/ प्र. क्र. ६७८ / प्राशि-३ , दिनांक १८ ऑगस्ट २००९ चे सहपत्र

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| | | **जिल्हा - ठाणे** | | |
| १ | सिध्दी एज्युकेशन ट्रस्ट ५०३, अनमोलरतन, सेवानिकेतन, हॉस्पिटल जवळ, उल्हासनगर, ता. अंबरनाथ | सनराईज इंटरनॅशनल स्कूल, पालीवली, बारवी डॅम रोड, बदलापूर ता. अंबरनाथ | इंग्रजी | १ ली |
| २ | रमाकांत एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट, कल्याण, पूर्व | डिवाईन पॅराडाईज स्कूल, चिंचपाडा, ता. अंबरनाथ | इंग्रजी | १ ली |
| ३ | जन जागृती शिक्षण मंडळ संभाजी नगर, मनोरम नगर रोड, ढोकळी, ठाणे | योगेश्वर इंग्लिश स्कूल, बुवापाडा, अंबरनाथ | इंग्रजी | १ ली |
| ४ | श्री श्रीकांत सिंह एज्युकेशन सोसायटी अ/५०४, राजश्रीधारा को.ऑप. हौ. सोसायटी, तेजपाल नगरी, कल्याण पूर्व जि. ठाणे | ठाकूर राजाराम सिंह इंग्लिश प्रायमरी स्कूल, पिसवली प. अमरदिप कॉलनी, श्रीमलंग रोड, कल्याण पूर्व जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| ५ | आधूनिक शिक्षण प्रसारक मंडळ कोपरखैरणे, नवी मुंबई. | ए.एस.पी.कॉन्हेंट इंग्लीश स्कूल , ता. वाडा, जि, ठाणे | इंग्रजी | १ ली |
| ६ | दि वसई नोट्रे डेम सिस्टर्स बंगली नाका, सांडोर वसई प. ४०१२०२, जि. ठाणे | नोटर डॅम स्कूल इंग्रजी माध्यम तरखड ता. वसई जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| ७ | नरसिंह एज्युकेशन सोसायटी, डी - १, चन्द्रेश रिजेन्सी, राहूल पार्क, भाईंदर पूर्व जि. ठाणे | आर.डी. मेमोरियल इंग्लिश वाकीपाडा, चन्द्रपाडा, ज्युचंद्र बाफाने रोड, नायगांव पूर्व जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| ८ | श्रीमती के.एल.टी. एज्युकेशन सोसायटी जी./५, राहूल ड्रीम टॉवर, बी. राहुल पार्क, भाईंदर पूर्व जि. ठाणे | राहूल इंटरनॅशनल स्कूल | इंग्रजी | १ ली |
| ९ | श्रीमती व्यासदेवी चौहान मेमोरियल ट्रस्ट, ३ अ, बाबूराव पलसापुरी चाल, लक्ष्मण नगर, कुरार मलाड पूर्व मुंबई ९७ | रॉयल पब्लिक स्कूल, प्लॉट नं. १५४/१०, तलावाजवळ, मनवेल पाडा, विरार पूर्व ता. वसई जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| १० | गायत्री एज्युकेशन ट्रस्ट, २ बी, ओसवाल नगरी, नालासोपारा पूर्व ता. वसई. ठाणे ४०१२०९ | ओम चिल्ड्रेन्स अकॅडमी, २ बी, ओसवाल नगरी, नालासोपारा पूर्व ता. वसई. ठाणे ४०१२०९ | इंग्रजी | १ ली |
| ११ | रॉयल एज्युकेशन ट्रस्ट, ७, बालमोहन सिंग चाळ, लक्ष्मण नगर, कुरार, मालाड प. मुंबई ९७ | रॉयल अकॅडमी सर्वे नं. ४२३, तिरुपती नगर, फेज १, विरार प. ता. वसई जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| १२ | जयदिप एज्युकेशन सोसायटी, कारगिल नगर, मनवेलपाडा, विरार पूर्व, | जयदिप विद्यामंदिर कारगिल नगर, मनवेलपाडा, विरार पूर्व, | इंग्रजी | १ ली |
| १३ | एम जी एम एज्युकेशन ट्रस्ट, ७/बी/२, बिल्लोमोरा हाऊस, ग्रँट रोड, मुंबई ७ | एम जी एम अकॅडमीज स्कूल, साईनाथनगर, चेक नाका, चंदनसार रोड, विरार पूर्व, ता. वसई जि. ठाणे | इंग्रजी | १ ली |
| १४ | सनराईज एज्युकेशन अॅन्ड वेलफेयर ट्रस्ट, प्रेमनगर, सातिवली तुंगारे फाटा. ता. वसई | सनराईज इंग्लिश-हिंदी स्कूल, प्रेमनगर, सातिवली . तुंगारे फाट, वसई पू. | इंग्रजी | १ ली |
| १५ | आदर्श फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट, ८५, प्रभु आळी पारनाका, भिवडी, जि. ठाणे | वालचंद्र लाल चंद राका इंग्रजी प्राथ. शाळा, भिवंडी ता. भिवंडी | इंग्रजी | १ ली |
| १६ | हाजी उमर मुसा एज्युकेशन ट्रस्ट भिवंडी, निजामपुरा, कोटरगेट भिवंडी | हुदा इंग्लिश प्राथमिक शाळा भिवंडी | इंग्रजी | १ ली |
| १७ | यादव समाज भिवंडी, राजाराम चाळ, राजीव गांधी नगर, कामातघर भिवंडी जि. ठाणे | रामकृष्ण अंग्रजी प्राथमिक विद्यालय, शिवराम नगर, स्टेशन रोड, कामतघर, भिवंडी. | इंग्रजी | १ ली |
| १८ | खुदा बख्श एज्युकशेन वेलफेअर सोसायटी, भिवंडी, घर नं. ८१४, रोशनबाग, भिवंडी. | जैद इंग्रजी प्राथ. शाळा, दुधबावडी न्यु गौरीपाडा, भिवंडी | इंग्रजी | १ ली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ | सेंट मेरीज सोसा. सं नं.२४७/१४ व्ही. प्लॉट नं. १७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६ | सेंट मेरिज पब्लिकस्कूल, सं नं.२४७/१४ व्ही. प्लॉट नं.१७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे | इंग्रजी | १ ली |
| ५४ | लोकसेवा प्रतिष्ठान ४३० मंगळवार पेठ, नरपतगीर कॉर्नर पुणे ११ | लोकसेवा मुला/मुलाची प्राथ्.इंग्रजी माध्यम शाळा, स.नं. १२९/२,१४८/१अ/१ पाषण सुसरोड | इंग्रजी | १ ली |
| ५५ | श्रीसंत गोरोबा शिक्षण संस्था पुणे नगर रोड पुणे १४ | तावरे ९९६०२७८४६१ | इंग्रजी | १ ली |
| ५६ | अभिनव एज्यु. सोसा. २०/२१ काशिनाथ पाटील नगर सातारा रोड, धनकवडी पुणे ४३ | अभिनव स्कूल २०/२१ काशिनाथ पाटील नगर सातारा रोड, धनकवडी पुणे ४३ | इंग्रजी | १ ली |
| ५७ | ओम शिक्षण संस्था, लक्ष्मी कॉलनी हडपसर पुणे २८ | एंजल मिकी मीनी स्कून जक्ष्मी कॉलनी हडपसर पुणे २८ | इंग्रजी | १ ली |
| ५८ | अ इ ऑन एज्यु सोसा , ए-९-१ गुरुनानक राज पार्क केशव नगर , चिंचवड | स्टेफिंग स्टोन स्कुल | इंग्रजी | १ ली |
| ५९ | कमला एज्यु सोसा, ताम्हाणे बिल्डींग प्रभात रोड लेन क्रं एरंडवणे पुणे | प्रतिभा इंटरनॅशनल स्कुल, एम आयडीसी चिंचवड पुणे | इंग्रजी | १ ली |
| ६० | पवना एज्यु सोसा व सोश ट्रस्ट, वाल्हेकरवाडी चिंवडेनगर चिंचवड | युनिक व्हिजन इंग्लिश मेडी. वाल्हेकरवाडी रोड चिंचवड | इंग्रजी | १ ली |
| ६१ | जग जिवन एंज्य संस्था गणेश नगर बोपखेल | जग जिवन इंग्लिश मिडी स्कुल गणेश नगर बोपखेल पुणे ३१ | इंग्रजी | १ ली |
| ६२ | मोरया शिक्षण संस्था ,१६ श्री धर नगर चिंचवड पुणे ३३ | एम एस एस इंग्लिश स्कुल श्रीधर नगर चिंचवड पुणे ३३ | इंग्रजी | १ ली |
| ६३ | सद्भावना ग्रूप फाउंडेशन, कोंद्रनगर, केशवनगर, मुंढवा, पुणे | फ्लोरिडा इंग्लिश स्कूल, कोंद्रनगर, केशवनगर, मुंढवा, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ६४ | श्री.बालाजी सेवा प्रतिष्ठान, जुन फुरसूंगी रोड, ता.हवेली, जि.पुणे | लिटील फ्लॉवर्स इंग्लिश मिडीअम स्कूल, | इंग्रजी | १ ली |
| ६५ | सोमेश्वर फौडेशन ४४६, गोपी भवन हॉटेल शैलजा लेन जंगली महाराज रोड,शिवाजीनगर पुणे ५ | सहयाद्री इंटरनॅशनल प्रायमरी स्कूल कोथरुड पुणे ३८ | इंग्रजी | १ ली |
| ६६ | रोझरी एज्यु.सोसा. १४, डॉ.आंबेडकर रोड, पुणे-१ | रोझरी प्रायमरी स्कूल स.नं. ३१४/अे/६बी वैदूवाडी हडपसर पुणे १३ | इंग्रजी | १ ली |
| ६७ | डेक्कन एज्यु.सोसा. फग्युसन कॉलेज कॅम्पस पुणे ४ | न्यु इंग्लिश मिडीयम स्कूल ४८६, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ३० | इंग्रजी | १ ली |
| ६८ | प्रज्ञानबोधिनी, सर्वे नं २४७, गणेशनगर,चिंचवड, पुणे-३३ | प्रज्ञानबोधिनी इंग्लिश् मिडी स्कूल, सर्वे नं२४७, गणेशनगर, चिंचवड,पुणे-३३ | इंग्रजी | १ ली |
| ६९ | श्री कृष्ण सेवा संघ आणि चॅरिटेबल ट्रस्ट, प्लॉट नं.२४२, जनक, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ | कल्पना इंग्लिश मिडी स्कूल,प्राधिकरण, निगडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७० | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, वडगाव (बु) पुणे | पवन गांधी सिंहगड स्प्रिगं डेल प्राथ. स्कूल, आंबाडवेट, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७१ | श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, कोंढापूरी, ता.शिरूर, पुणे | इंग्रजी प्राथमिक शाळा, कोंढापूरी | इंग्रजी | १ ली |
| ७२ | केदारनाथ लायब्ररी अ‍ॅण्ड एज्यु.स्पोर्टस डेव्हलपमेंट सोसा. | ज्ञानसाधना विद्यामंदिर तुकाईव्हिला सं.न ४१ अ /२/१/२४/२५ मौजे वडगाव बुा.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७३ | कै . सौ. सुमन जगताप चॅरिटेबल ट्रस्ट १०२८, सहकारनगर नं. १ पुणे ९ | तळजाई हिल्स इंग्लिश मिडीयम स्कूल स.नं. ६, धनकवडी पुणे ४३ | इंग्रजी | १ ली |
| ७४ | न्यु. एज्यु.सोसा. ४४२, सोमवार पेठ, पुणे ११ | न्यु. एज्यु.सोसा.ची प्राथ्. शाळा ४४२, सोमवार पेठ, पुणे ११ | इंग्रजी | १ ली |
| ७५ | सिलव्हर स्प्रिंग चॅ. फौडेशन स.नं. ७९ प्लॅट नं. १३ सुरजनगर, कोथरुड, पुणे-२९ | सिलव्हर स्प्रिंग स्कूल स.नं. ७९ प्लॅट नं. १३ सुरजनगर कोथरुड | इंग्रजी | १ ली |
| | जिल्हा - अहमदनगर | | | |
| १ | श्री. नवनाथ रुरुल एज्युकेशन अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट सोसायटी, पदमपुरा, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद | नाथ व्हॅली स्कल, अकोले, ता.अकोले. जि.अहमदनगर | इंग्रजी | १ ली |

तात्काळ

**कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)**

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नख्राप्राशा/पुवि-०९ २८९३/८६.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 1 FEB 2011

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ,पिंपरी चिंचवड,पुणे.

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि३ दि.१८.८.२००९
२. मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.
३. शासन शुध्दीपत्रक क्रमांक नप्राशा १००८/(प्र.क्र.६७८)/प्राशि ३ दि. १४/१/२०११.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | अ इ ऑन एज्यु सोसा , ए-९-१ गुरुनानक राज पार्क केशव नगर , चिंचवड | स्टेपिंग स्टोन स्कूल,थेरगाव,पुणे ३३. | पहिली | इंग्रजी |

## कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स. यांची सही असे.

(कु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१करिता.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

प्रत : १.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत : १.अध्यक्ष/सचिव

अ इ ऑन एज्यु सोसा , ए-९-१ गुरुनानक राज पार्क केशव नगर , चिंचवड

२.शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,पुणे.

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी )**

जाक्र. प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी /२०१६ 1200/28
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. यांचे कार्यालय
दिनांक : 19 JAN 2016

प्रति

प्रशासन अधिकारी ,
शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड महानगरपालीका

विषय: प्रथम मान्यता मिळणेबाबत
एऑन एज्युकेशन सोसायटी पुणे

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.नप्राशा-१००८/प्रक्रं ६७८/प्राशि-३
दि. १८.०८.२००९
२.आपले पत्र जा.क्र. शिक्षण खाप्राशा/३/कावि/५६९/१२ दिनांक १२/१०/२०१२
३.संस्थेचे पत्र दिनांक १०.१२.२०१४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्था । संदर्भ क्र-१ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २००९-१०-या शैक्षणिक वर्षामध्ये शाळा परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००९-१०-या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ व ३,चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. १ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००९ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६ |
| १. | एऑन एज्युकेशन सोसायटी पुणे | स्टेपिंग स्टोन स्कूल, थेरगांव पुणे | १ ली | इंग्रजी | जुन २००९ |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी** आपोआप रद्द **होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशतींच्या अधिन राहून नेमला पाहिजे

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यपणे कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनाक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.शिक्षणधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे

२.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

४.अध्यक्ष/सचिव, एऑन एजयुकेशन सोसायटी , पुणे

**<u>कायम विना अनुदान तत्वावर</u>**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/९५७/२०१७.
दिनांक :- ८ / ३ /२०१७

**प्रति,**

**अध्यक्ष**
आयन एज्युकेशन सोसायटी
चिंचवड पुणे

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| द स्टेफिन स्टोन स्कुल, चिंचवड | इंग्रजी | नैसर्गिक | इ. २ री ते ५ वीच्या प्रथम तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**<u>अटी व शर्ती</u>** :-

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांसाठी २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक राहील.

८) सदरची मान्यता संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे दिलेली असून त्यात तफावत आढळल्यास वा चुकीची आढळल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्यांची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

९) सदर मान्यतेसंदर्भात कोणाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्याची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

७/३/२०१७

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/४४७/२०१७.
दिनांक :- २० /९/२०१७

**प्रति,**

**अध्यक्ष**
आयन एज्युकेशन सोसायटी
चिंचवड पुणे

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| द स्टेफिन स्टोन स्कुल, चिंचवड | इंग्रजी | नैसर्गिक | इ. ६वी ते ७ वीच्या प्रथम तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांसाठी २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक राहील.

८) सदरची मान्यता संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे दिलेली असून त्यात तफावत आढळल्यास वा चुकीची आढळल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्यांची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

९) सदर मान्यतेसंदर्भात कोणाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास सदरची मान्यता रद्द करण्यात येईल व त्याची जबाबदारी संस्थेवर व मुख्याध्यापकांवर राहील.

20/9/2017

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.